पुढारी

# विद्यापीठात शनिवारी शाहू महाराजांच्या चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ शाहू संशोधन केंद्र आणि महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित शाहू चरित्राचे राजर्षी शाहू रशियन व इटालियन चरित्र अनुवाद ग्रंथाचा (रशियन : डॉ. मेघा पानसरे व प्रा. तत्याना बीकवा इटालियन डॉ. अलेस्सांद्रा कोन्सोलारो) प्रकाशन सोहळ्याचे दि. ६ मे रोजी आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू सिनेट सभागृह येथे प्रकाशन सोहळा होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीचे अध्यक्ष ॲड. श्रीपतराव शिंदे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

0 1 MAY 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू रशियन, इटालियन चरित्र ग्रंथाचे शनिवारी प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्र आणि महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक डॉ. जयसिंगराव पवार लिखित 'राजर्षी रशियन व इटालियन चरित्राचे अनुवाद ग्रंथाचे' प्रकाशन होणार आहे. शाहूंवरील रशियन भाषेतील पुस्तकातील अनुवाद शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे आणि रशियातील तत्याना बीकवा यांनी केले आहे. इटालियन भाषेतील शाहूंवरील पुस्तकातील अनुवाद प्रोफेसर अलेस्सांद्रा कॉन्सोलारो यांनी केला आहे. या ग्रंथाचे प्रकाशन शनिवार ६ मे रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या शाहू सिनेट सभागृहात साहित्यिक व विचारवंत सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते होणार आहे. श्रीमंत शाहू छत्रपती यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. तरी या प्रकाशन सोहळ्यासाठी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीचे अध्यक्ष ॲड.